# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

शिक्षणाचा अधिकार

सर्व शिक्षा अभियान

सारे शिकूया, पुढे जाऊया

जा.क्र. :– 240 /शि.वि./सशिअ दिनांक – 21/08/2014

प्रति,

सर्व मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका
प्राथमिक/उच्च प्राथ. शाळा
म.न.पा. नागपूर

**विषय – सन 2014–15 मध्ये भारत सरकारच्या निर्देशानुसार नागपूर महानगरपालिका प्राथमिक शाळांमध्ये "चावडी वाचन" या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याबाबत.**

**संदर्भ – 1) भारत सरकारच्या प्रकल्प मान्यता मंडळाच्या दि. 06/02/2014 रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.**
**2) जा.क्र. मप्राशिप/सशिअ/गुणवत्ता/चा.वा./2013–14/3342 दि. 13/8/2013**
**3) जा.क्र. मप्राशिप/सशिअ/गुणवत्ता/चा.वा./2014–15/3320 दि. 20/8/2014.**
**4) जा.क्र. 483 म.न.पा./शि.वि./स.शि.अ., दि. 21/06/2013, या कार्यालयाचे पत्र.**

राज्याचा **"चावडी वाचन"** हा कार्यक्रम भारत सरकारच्या पातळीवरही उल्लखनीय ठरलेला आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांची संपादणूक पातळी विचारात घेऊन अध्ययन अध्यापन प्रक्रिया प्रभावी करता येईल. विविध घटकांतील आंतरक्रियाद्वारा विद्यार्थ्यांच्या कौशल्यामध्ये वृध्दी करून प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सर्व स्तरावरून सर्वकष व सातत्यपूर्ण प्रयत्न, परिणामकारक, संनियंत्रण व सक्रीय सहभाग आवश्यक आहे.

याबाबत सर्व शिक्षा अभियान कार्यालयाचे पत्र क्र. 483 म.न.पा./शि.वि./स.शि.अ., दि. 21/06/2013, रोजी सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार सन 2014–15 मध्येही या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी. जेणेकरून प्रत्येक विद्यार्थ्यास त्यांचे कौशल्य सादर करण्याची संधी मिळेल, शिक्षकांना अध्ययन–अध्यापनात सुधारणा करण्यास वाव मिळेल, पालकांना त्यांच्या पाल्याच्या प्रगतीची माहिती मिळू शकेल.

**अंमलबजावणीचे स्वरूप :**

1. नागपूर महानगरपालिकातील सर्व माध्यमाच्या शाळांमध्ये राबविण्यात यावा.
2. शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यास टप्प्याटप्प्याने सहभागी होण्याची संधी देण्यात यावी.
3. **"चावडी वाचन"** कार्यक्रम सहज, आनंददायी, अनौपचारिक वातावरणात घेण्यात यावा. वातावरण निर्मितीसाठी कार्यक्रमाच्या प्रारंभी काही बालस्नेही कृती घ्याव्यात.
4. **"चावडी वाचन"** कार्यक्रम हा सातत्यपूर्ण व सर्वकष मूल्यमापनाचा एक भाग आहे. त्यामुळे शिक्षकांनी विद्यार्थ्यांची तयारी नियमित अध्ययन अध्यापन प्रक्रियेतून करून घ्यावी.
5. या कार्यक्रमामध्ये सर्व शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख/शाळा निरिक्षक, झोन स्तरावरील व झोन स्तरावरील, सर्व यंत्रणा, लोकप्रतिनिधी, समाजातील सर्व शिक्षणप्रेमी, शिक्षणतज्ञ, युवक, समाजसेवक, शिक्षक–पालक व माता–पालक संघाचे सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य व इतर ग्रामस्थ यांचा सहभाग राहील.

6. तसेच स्थानिक प्राधिकरण व पर्यवेक्षीय यंत्रणेतील सर्व घटक **"चावडी वाचन"** कार्यक्रमासाठी उपस्थित राहतील.
7. **"चावडी वाचन"** कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत किमान तीन दिवस अगोदर सर्व संबंधितांना कळविण्यात यावे.
8. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी निधीची आवश्यकता असल्यास सर्व शिक्षा अभियानांतर्गत शाळा स्तरावर उपलब्ध असलेल्या शाळा \अनुदानाचा उपयोग करण्यात यावा.
9. **"चावडी वाचन"** शहर साधन केंद्रांतर्गत प्रत्येक शाळेमध्ये राबविली जात असल्याची शहर साधन समन्वयकांनी खात्री करावी.
10. शिक्षण विस्तार अधिकारी / शाळा निरिक्षक, गट शिक्षणाधिकारी / सहा. शिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी, अधिव्याख्याता, प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, विभागीय शिक्षण उप संचालक, यांनी निवडक शाळांमधील **"चावडी वाचनामध्ये"** सहभागी व्हावे.
11. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, आयुक्त, महानगरपालिका यांनी या कार्यक्रमाचे पर्यवेक्षण व संनियंत्रण करावे.
12. सर्व शिक्षण संचालक, सह संचालक व शिक्षण उप संचालक यांनीही **"चावडी वाचन"** या कार्यक्रमामध्ये सहभागी व्हावे. तसेच त्यांचे अधिनस्त सर्व यंत्रणा या कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी कार्यान्वित करावी.
13. **"चावडी वाचन"** कार्यक्रमाच्या दिवशी सर्व विद्यार्थ्यांची शाळेमध्ये उपस्थिती अनिवार्य राहील.
14. **"चावडी वाचन"** कार्यक्रमास वाचन करावयाच्या विद्यार्थ्यांची निवड उपस्थित गावकरी तथा लोक करतील.
15. पर्यवेक्षीय यंत्रणा तसेच शाळा व्यवस्थापन समिती यांनी **"चावडी वाचन"** कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत निरीक्षण, अभिप्राय याची नोंद शेरे बुक नोंदवहीत करण्यात यावी. त्यामध्ये प्रामुख्याने विद्यार्थ्यांच्या वाचनाची प्रगती बाबतच्या नोंदी करण्यात याव्यात.

**कालावधी :**

- शाळेमध्ये मुख्याध्यापक व शिक्षकांनी दर महिन्यास सोयीच्या दिवशी संबंधित वर्गातील सर्व विद्यार्थ्यांचे वर्गामध्ये वाचन घ्यावे.
- पालक व समाजासमोर प्रत्यक्ष **"चावडी वाचन"** कार्यक्रम सकाळी 8 ते 11 किंवा सर्वांच्या सोयीनुसार सुमारे 3 तास कालावधीसाठी पुढीलप्रमाणे घ्यावा. :
  - ➢ प्रथम : माहे ऑक्टोबर–2014 मधील दुसरा / चौथा शनिवार पैकी एक दिवस.
  - ➢ द्वितीय : माहे डिसेंबर–2014 मधील दुसरा / चौथा शनिवार पैकी एक दिवस
  - ➢ तृतीय : माहे फेब्रुवारी–2014 मधील दुसरा / चौथा शनिवार पैकी एक दिवस
  - ❖ वरील नियोजनानुसार **"चावडी वाचन"** कार्यक्रमाचे आयोजन शनिवार या दिवशी करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. तथापि, स्थानिक बाजाराचा दिवस विचारात घेऊन अन्य सोयीच्या दिवशी वरिष्ठ कार्यालयाच्या परवानगीने बदल करता येईल.

**साहित्य :** **"चावडी वाचनासाठी"** पाठयपुस्तका व्यतिरिक्त यापूर्वी देण्यात आलेले विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्य, अध्ययन कार्ड, ग्रंथालयातील पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिक इत्यादीचा संदर्भ साहित्य म्हणून उपयोग करण्यात यावा. वाचनासाठी साहित्य उपलब्ध करून देताना त्यामध्ये इयत्तानिहाय बदल करण्यात यावेत.

**अहवाल :** सर्व शिक्षक त्यांच्या वर्गाचे संक्षिप्त अहवाल छायाचित्रणासह तयार करून मुख्याध्यापकांना देतील व सर्व वर्गाचा संकलित अहवाल मुख्याध्यापक तयार करतील व त्याचे

सादरीकरण शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठकीमध्ये करण्यात यावा. कार्यक्रमाच्या प्रगती विषयक झालेल्या चर्चेनुसार योग्य त्या उपाय योजना कराव्यात.

बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायदा, 2009 मधील तरतुदीनुसार 6 ते 14 वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकास गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण देण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे. अध्ययन समृध्दीसाठी **"चावडी वाचन"** कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी आपली सर्व प्रशासकीय व पर्यवेक्षीय यंत्रणा उत्स्फूर्तपणे शत प्रतिशतरित्या योगदान देण्याच्या दृष्टीने कर्यान्वित करावी. **"चावडी वाचन"** कार्यक्रमानंतर यशोगाथांचे अहवाल छायाचित्रणासह दोन आठवडयाच्या आत शहर साधन केंद्रातील साधनव्यक्ति मार्फत या कार्यालयाकडे सादर करण्यात यावा.

शिक्षणाधिकारी
**नागपूर महानगरपालिका नागपूर**

**प्रतिलिपी :–**

1. मा. अपर आयुक्त, म.न.पा. नागपूर.
2. मा. उपायुक्त, म.न.पा. नागपूर.
3. लेखाधिकारी सशिअ. म.न.पा. नागपूर
4. शाळा निरिक्षक, म.न.पा. नागपूर
5. ~~श्री धाईत श्री अपरे~~ शहर साधन समन्वयक, म.न.पा. नागपूर

श्री आटी

शिक्षणाधिकारी
**नागपूर महानगरपालिका नागपूर**

E:\Rahul\2014-15\Chavadi & Abhayas Jatra\Letter